संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# यंदाच्या उन्हाळ्याचे दुहेरी चटके

**आखाती** देशातील युद्धाचा चटका बसत असताना आता उन्हाळ्याच्या कडक झळाही जाणवू लागल्या आहेत. या युद्धाचे पर्यावरणाच्यादृष्टीने होणारे दुष्परिणाम आहेतच. परंतु आखाती देशातून मिळणाऱ्या इंधन पुरवठ्यावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असल्याने अनेक वस्तूंची टंचाई निर्माण होईल. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीदेखील भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजे यावेळचा उन्हाळा हा दुहेरी चटका देणारा ठरेल असेच एकूण वातावरण आहे. पुढच्या आठ- पंधरा दिवसांत जरी युद्ध थांबले तरी सगळी परिस्थिती पूर्ववत व्हायला पुढचा महिना-दीड महिना लागू शकतो. इराण आणि अन्य अरब देशांचे दुखावलेले संबंध हे भविष्यकाळात कितपत पूर्ववत होतील याबद्दल शंका आहे. प्रामुख्याने या सगळ्या अरब देशांचे अर्थकारण हे इंधन उत्पादन आणि तत्संबंधीचा व्यापार याच्याशी निगडीत असते. भारतासारखा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश या देशांकडूनच मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करतो. आणि त्याच्या मोबदल्यात अन्य कृषी आणि औद्योगिक उत्पादनांचा व्यापारही करीत असतो. परंतु आता विस्कटलेली सगळी घडी पूर्ववत होता होता बराच कालावधी जाईल. त्याचा परिणाम म्हणूनच भारतात बऱ्याच वस्तूंची टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारने युद्ध लक्षात घेऊनच आपला तेलसाठा तयार ठेवला होता. परंतु देशभरातील एकूण इंधनाची मागणी आणि पुरवठ्याचे प्रमाण लक्षात घेतले तर हा साठा फार काळ टिकणारा नाही. स्वाभाविकपणे इंधनाचा तुटवडा हा इंधनाच्या किंमतवाढीमध्ये होतो. आणि इंधन किंमतवाढीचे परिणाम हे अगदी जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीपर्यंत पोहोचतात. आज तशीच परिस्थिती निर्माण होऊ घातलेली आहे. भारताला जरी रशियाकडून काही प्रमाणात तेल मिळत असले तरी एकूण गरजेचा विचार केला तर हा सगळा इंधन पुरवठा कायम ठेवणे म्हणजेच विशिष्ट कालावधीत विशिष्ट साठा तयार ठेवणे भारताला आवश्यक ठरते. यातला लक्षात घेण्याजोगा भाग असा आहे की, इराणने इतर सगळ्याच अरब देशांवर हल्ले केल्याने तिथली परिस्थिती अस्थिर झालेली आहे.

### महागाई आणि पाणीटंचाई

उन्हाळा म्हटल्यानंतर पाणी टंचाई हा प्रकार कायमचा ठरलेला असतो. व्यापक अर्थाने बघितले तर पाणीसुद्धा व्यक्ती आणि समाजाचे व्यवहार सुरळीत चालू ठेवण्यासाठीचे महत्त्वपूर्ण इंधन ठरते. युद्धाच्या निमित्ताने काही वस्तूंची टंचाई निर्माण होत असताना राज्याच्या अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याचे प्रश्न आतापासूनच निर्माण होऊ लागले आहेत. खानदेश, मराठवाडा, विदर्भाचा काही भाग, पश्चिम महाराष्ट्रातले काही जिल्हे हे पाणीटंचाई सदृष्य परिस्थितीत आहेत. उत्तर महाराष्ट्रात जळगावला आतापासूनच एक दिवसाआड पाणी द्यायला सुरुवात झालेली आहे. इतर जिल्ह्यांमध्येसुद्धा पुढच्या दोन-तीन आठवड्यात अशीच काहीशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे मार्च महिन्याच्या अखेरीपर्यंत उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. हे तापमान नेहमीपेक्षा जास्त असेल असाही वेधशाळांचा कयास आहे. स्वाभाविकपणे पिण्याच्या पाण्याचे प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. खरे तर यावर्षी सगळीकडे चांगला पाऊस झाला. नद्या, धरणं, ओसंडून वाहत होते. परंतु पाण्याची वाढती मागणी, शिवाय पाण्याचा अपव्यय या कारणांनी हे परंपरागत पाणीसाठे पाण्याची वाढती गरज भागवू शकत नाहीत. यातला एक वेगळाच प्रश्न म्हणजे वाढत्या तापमानाने धरणं किंवा जलसाठ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होते. आणि पाण्याची पातळी खाली जात राहते. याचा अर्थ पाणी साठवण्याच्या आणखी वेगळ्या पद्धती विकसित करणे आवश्यक ठरते. बऱ्याच ठिकाणी जलसिंचनाच्या योजना पूर्णत्वाला जाऊ शकलेल्या नाहीत. अगदी जलयुक्तशिवारसारख्या योजनांचाही प्रभाव पडू शकलेला नाही. अशा एक ना अनेक कारणांमुळे पाणी साठा खालावत जातो. सरकारकडून दरवर्षीप्रमाणे टँकरच्या मार्फत ठिकठिकाणी पाणी पुरवलेही जाते. परंतु पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला आहे. वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण मात्र त्याप्रमाणात जलसिंचनाच्या सोयीसुविधा पूर्ण केल्या जात नाहीत. विशेषतः ग्रामीण किंवा निमशहरी भागाकडे दुर्लक्ष होते. जुने प्रकल्पही वेळेत पूर्ण होत नाहीत. म्हणूनच भरपूर पाऊस पडूनही पाण्याची टंचाई भेडसावत राहते.

### पाण्यासाठीही युद्धच

दरवर्षीचा हा पाणीटंचाईचा चटका आदिवासी भागासह ग्रामीण महाराष्ट्राला सहन करावा लागतो. याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारकडून मोठ्या महानगरांचाच प्राधान्याने विचार होतो. याची अगदी ताजी दोन ठळक उदाहरणे म्हणजे मुंबईचा पाणीपुरवठा अखंड राहावा म्हणून दोन नव्या योजना अंमलात आणल्या जात आहेत. त्याच्यावर जवळपास १५ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत तर पुढच्या पाच वर्षांत येऊ घातलेल्या तिसऱ्या मुंबईचा विचार करून आतापासूनच पाणीपुरवठ्याच्या मोठ्या योजना हाती घेतल्या आहेत. त्याच्या प्राथमिक कामासाठी दहा हजार कोटी रुपये मंजुरही झालेले आहेत. याच्या उलट आदिवासी किंवा ग्रामीण भागात छोट्या छोट्या पाणीयोजनासुद्धा निधीच्या टंचाईचे कारण देऊन पूर्णत्वाला जाऊ शकत नाहीत. याचा अर्थ पाणी पुरवठ्याबाबत नियोजनपूर्वक धोरण राबवले जात नाही. किंबहुना हाती घेतलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पांचा पाठपुरावा होत नाही. अगदी महाराष्ट्राच्या जिल्हा ठिकाणीसुद्धा उन्हाळाच नव्हे तर वर्षभर दोन ते तीन दिवसाआड एकदाच पाणीपुरवठा केला जातो. आज पूर्वीइतका दुष्काळाचा प्रभाव जरी जाणवत नसला तरी गावागावातील पाणीटंचाईची समस्या कायम असल्याचेच म्हणावे लागते. भरपूर पाऊस पडूनही ही परिस्थिती निर्माण होत असेल तर पावसाप्रमाणे नियोजनही गैरकारभाराच्या महापुरात वाहून जाते असे म्हणावे लागेल. यंदाची परिस्थिती लक्षात घेतली तर पाण्यासाठीदेखील लोकांना युद्धाचाच सामना करावा लागतो आहे.